# अखंड भारत ?

आज आपला भारत देश निश्चितपणाने एका महासत्तेकडे मार्गक्रमण करत आहे. विश्वातील एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून उदयास येत आहे.येणाऱ्या काळात भारत हा 'विश्वगुरु' च्या नावाने ओळखला जाईल हे मी ठामपणे सांगू शकतो. पण या प्रवासामध्ये जी एक गोष्ठ याला नाधक ठरु शकते,ती म्हणजे भारताची अखंडता भारताच्या एकतेची सौंदर्य कोणत्याही परिस्थितीत ढळता कामा नये. भारत हा जर जाती - धर्माच्या नावाखाली जर विभागला गेला तर त्याची शक्ती अपूरी पडेल.लोकशाही कमकुवत होईल. देशाअंतर्गत कलह वाढीस लागेल आणि भारताचा महासत्तेकडील प्रवास खंडित होईल.भारताची एकता आणि अखंडता अबाधित ठेवणे ही भारताच्या प्रत्येक सुजान नागरिकाची जबाबदारी आहे. देशाच्या सध्याच्या परिस्थितीवरुन भविष्याचा वेध घेण्याचा आणि एका निर्विवाद सत्याकडे बोट दाखवण्याचा केलेला हा छोटासा प्रयत्न.




सार्‍या जगाचे लक्ष्य लागलेली भारताची २०१९ ची लोकसभा निवडणूक अखेर पार पडली. आणि पुन्हा एकदा भारतीय जनता पक्ष्याचे सरकार बहुमताने सत्तारुढ झाले.'विविधता में एकता' असणारा आपला भारत देश, या विविधतेला कधी , छेद गेला कुणाला कळलच नाही. खरतर सत्य पाहायची शक्तीच आपण

हरवून बसलो आहे. धर्म आणि माणूस हे म्हनायला वेगळे असले तरी हे मनाने अस मानायला कोणी तयार नाही. माणूस आणि धर्म दोन्ही एक होवून बसले आहेत. जिथं धर्म आणि जात आहे तिथं सत्य

आपोआप झोलं जात आहे. या देशाचे सुजान नागरिक या नात्याने आपण या जाती – धर्माच्या मोहपाशात कदापि अडकता कामा नये.

भारतीय संविधनानुसार कलम २५ ते २८ अन्वये प्रत्येकाला आपल्या आवडिचा धर्म पाळण्याचा आणि स्विकारण्याचा अधिकार आहे. माझा यावरती कोणताही आक्षेप नाही. पण तो धर्म देशाच्या राजकारणामध्ये, समाजकारणामध्ये येऊ नये याची आपण काळजी घेतली पाहिजे. तरीही काही नेत्यांकडुन जाती – धर्मांचा विषय जाणुनबुजून आणला गेला. तेही आचारसंहितेचे उल्लंघन करुन हे कितपत योग्य आहे? याला मी कदापि समर्थन करणार नाही. मग तुम्ही या देशाचे एक सुजान नागरिक  या नात्याने अशा गोष्टींना समर्थन करणार का?

देशाच पवित्र मंदिर असणाऱ्या संसदेमध्ये जातीवाचक नारे लावताना या नेत्यांना लाज कशी नाही वाटत.तुम्ही संसदेमध्ये पोहचलात सर्व धर्मांच्या लोकांच्या मतांच्या बळावर मग तुम्ही त्या ठिकाणी तुमच्या वैयक्तिक धर्माचा जातीचा उल्लेख का करताय? असच जर चालल तर जाती धर्मामध्ये संभ्रम निर्माण होईल. विशेषत: बहूसंख्य आणि अल्पसंख्याक यांच्यामध्ये. ज्याचा परिणाम देशाच्या एकतेवर, अखंडतेवर व्हायला वेळ लागणार नाही. देशाअंतर्गत कलह वाढीस लागेल, लोकशाही कमकुवत होईल.धर्मनिरपेक्षतेवर प्रश्न उभा राहील, आणि याचा फायदा शत्रू राष्ट्रांना आणि दहशतवादी, आतंकवादी संघटनांना होईल.

आपल्या याच कमजोरीचा फायदा परकियांनी कसा घेतला याचा इतिहास साक्षी आहे. हा देश अखंड राहावा, धर्मनिरपेक्ष रहावा, याची जबाबदारी आता आपल्या सर्वांवर आहे.

आपल हे दुर्दैव आहे की, जे महापुरुष या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढले, अखंडतेसाठी लढले ते आज एका विशिष्ठ जाती – धर्मांचे होऊन

बसलेत. या जाती – धर्मांच्या मोहपाशातून बाहेर पडून आपण आपले सर्वोच्च योगदान या देशाच्या उज्वल भवितव्यासाठी देणे गरजेचं आहे. आपण या नेत्यांच्या भूलशापांना बळी पडता कामा नये. हा देश आपणाला अखंड राखायचा आहे. स्वामी विवेकानंदांची 'भारत जागो विश्व जगाओ' ची उपाधी सत्यात उतरवायची आहे.डॉ.ए.पी.जे अब्दुल

कलामांचं स्वप्न **(Vision 2020)** आपल्याला साकार करायचं आहे. भारताला महासत्तेकडे मार्गस्थ करायचे आहे. लोकशाहीतील एकता आणि अखंडता आपल्याला अबाधित ठेवायची आहे येणाऱ्या असंख्य वर्षांसाठी.



कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालीका आणि समाजमाध्यमे हे भारतीय लोकशाहीचे चार मूलभुत आधारस्तंभ मानले आहेत. यांनी आपल मत कायद्याच्या चौकटीत राहून कोणताही जातीभेद, उच्च – नीच, स्त्री पुरुष असा भेद न जुमानता आपल्या कर्तव्यांशी आणि सत्याशी बांधील रहायला हव, आणि जर अस होत नसेल तर आजच्या शिक्षित तरुण पिढीला पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरावे लागणारचं.....

मुल्ला मुस्तफा अन्वर
तृतीय वर्ष – विज्ञान